नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/01/2023 (शुक्रवार) दुपार

---

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :– दिनांक १७/०१/२०२३ चे २३.३० वा. ते १४.३० वा. ते २३/१/२०२३ चे २२.३० वा. दरम्यान फिर्यादी वय ३० वर्ष हिचे फेसबुक अकाउंट असुन यातील आरोपी फेसबुक परी कुमेरीया या नावाच्या फेसबुक अकाउंट धारक यांने फिर्यादी हिचे फेसबुक अकाउंट वर अश्लील शब्दात मॅसेज करून फिर्यादी हिला शारीरिक सुखाची मागणी केली असुन वारंवार अश्लील मॅसेज करून पाठलाग केला व फिर्यादीचा विनंयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३५४ (ड) भादवी सहकलम ६७ माहीती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जयपालसिंह गिरासे पो.स्टे नरखेड मो.नं. ८३५५९५५५३८ हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत हनुमान नगर काटोल येथे दिनांक २६/०१/२०२३ चे १३.०० वा. ते १३.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– भावेश भोजराज मनगटे, वय १७ वर्ष, रा. हनुमान नगर काटोल हा आपल्या घरी हजर असता फिर्यादीचे घरासमोर फिर्यादीचा मामा नामे– प्रमोद गायधने, वय ३६ वर्ष, रा. हनुमान नगर हा त्यांचे मित्रा सोबत बोलत असता आरोपी नामे–१) राहुल गायकवाड व त्याचा मित्र रा. हनुमान नगर काटोल यांनी संगणमत करून फिर्यादीचे मामाला ''तु शिवि का दिली'' या कारणावरून त्यास बांबुचे काठीने डोक्यावर मारून जखमी केले व फिर्यादीने मध्यस्थी केली असता त्याला सुध्दा मारपीट करून शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोंदे मो. नं ९८५०९००७६८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत २० किमी अंतरावर मांडवा येथे दिनांक ०६/०१/२०२३ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सौ. अस्मिता जयस्वाल राठोड, वय २३ वर्ष, रा. मांडवा यांचे माहेर हे मांडवा गावातील असुन तिचे वडील आरोपी नामे– उदाराम धन्नो राठोड, रा. मांडवा यांनी फिर्यादीची आई नामे– वनिता राठोड हिला मागील १५ वर्षापासुन सोडुन दिले व गावातील विधवा महीलेला पळवुन नेवुन नागपुर येथे राहत आहे. मागील ३ महीन्यापासुन फिर्यादीचे वडील हे तिचे काकाचे घराचे बांधकाम असल्याने तेथे राहत आहे. फिर्यादीचे वडील हे नेहमी गावी आल्यावर आईसोबत व फिर्यादीसोबत भांडण करतात. नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी व तिची आई शेताकडे काम करण्याकरिता जात असतांना तिचे आईने तिचे मोठया भावाला म्हटले की, तुम्ही कोणतेच काम करत नाही गावात रिकामे फिरता असे म्हटले असता आरोपीने घरासमोर येवुन म्हटले की ''तु मलाच बोलत आहे.'' असे म्हणुन दारूचे नशेत फिर्यादीला व तिचे आईला शिवीगाळ करून त्याचे हातातील लोखंडी सलाखीने उजव्या हातावर मारल्याने हाताचे मधल्या बोटाला जखम झाली व रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं.७५७ भोजराज झाडे पोस्टे उमरेड ८९९९४३४२७२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**